**L. A. BILL No. LIV OF 2011.**

A BILL

TO AMEND CERTAIN ENACTMENTS TO CHANGE THEIR SHORT TITLES FROM "BOMBAY ACTS" TO "MAHARASHTRA ACTS".

**सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५४.**

**विवक्षित अधिनियमांची संक्षिप्त नावे "मुंबई अधिनियम" याऐवजी "महाराष्ट्र अधिनियम" अशी बदलण्यासाठी त्यांत सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**ज्याअर्थी,** विवक्षित अधिनियमांचा भविष्यकाळात अधिक योग्य संक्षिप्त नावाद्वारे उल्लेख करणे सुकर होण्यासाठी आणि विद्यमान महाराष्ट्र राज्यास ते लागू असल्याचे विशद करण्यासाठी, त्यांच्या संक्षिप्त नावात "मुंबई अधिनियम" याऐवजी "महाराष्ट्र अधिनियम" असा बदल करण्याकरिता आणि विवक्षित परिणामस्वरूप व आनुषंगिक तरतुदी करण्याकरिता, त्या अधिनियमांमध्ये सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, महाराष्ट्र (विवक्षित मुंबई अधिनियमांच्या संक्षिप्त नावात बदल करण्याबाबत) अधिनियम, २०११ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

एचबी-१७६४-१.

**मुंबई अधिनियमांच्या संक्षिप्त नावांची सुधारणा.**

२. या अधिनियमाला जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, दिनांक १ मे १९६० पूर्वी अधिनियमित केलेल्या मुंबई अधिनियमांच्या संक्षिप्त नावांमध्ये अनुसूचीच्या स्तंभ (५) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्याप्ती पुरत्या सुधारणा करण्यात येतील आणि त्या सुधारणा दिनांक १ मे १९६० पासून करण्यात आल्या असल्याचे मानण्यात येईल.

**मुंबई अधिनियमांच्या उल्लेखात फेरबदल होणार नाहीत.**

३. या अधिनियमाच्या कलम २ अन्वये अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुंबई अधिनियमांच्या संक्षिप्त नावांमध्ये सुधारणा करण्यात आली असली तरीही, त्या अधिनियमांच्या नावासमोर अनुसूचीच्या अनुक्रमे स्तंभ (२) आणि (३) यांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या त्या अधिनियमाचे वर्ष आणि क्रमांक यासंदर्भातील उल्लेखात कोणताही फेरबदल होणार नाही.

**मुंबई अधिनियम, इतर राज्य अधिनियमिती आणि दुय्यम विधीविधानातील "बॉम्बे" आणि "ग्रेटर बॉम्बे" यांच्या संदर्भाचा अर्थ लावणे.**

४. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, इतर कोणत्याही राज्य अधिनियमितीतील मुंबई अधिनियमांच्या संक्षिप्त नावाचा कोणताही संदर्भ, किंवा कोणत्याही मुंबई अधिनियमामध्ये किंवा इतर कोणत्याही राज्य अधिनियमितीमध्ये आलेला किंवा अशा कोणत्याही मुंबई अधिनियमान्वये किंवा राज्य अधिनियमितीन्वये केलेले कोणतेही नियम, विनियम, उपविधी, योजना, काढलेल्या अधिसूचना किंवा आदेश अथवा इतर कोणतेही संलेख यांमध्ये आलेला "बॉम्बे" अथवा "ग्रेटर बॉम्बे" या नावाचा कोणताही संदर्भ हा, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या उक्त मुंबई अधिनियमांच्या संक्षिप्त नावाचा किंवा, यथास्थिति, "मुंबई" अथवा "बृहन्मुंबई" या नावाचा संदर्भ आहे, असा त्याचा अर्थ लावण्यात येईल.

## अनुसूची

(कलमे २ व ३ पहा)

| अ. क्र. (१) | अधिनियमाचे वर्ष (२) | अधिनियमाचा क्रमांक (३) | विद्यमान मुंबई अधिनियमांचे संक्षिप्त नाव (४) | विद्यमान मुंबई अधिनियमांचे सुधारणा केल्याप्रमाणे संक्षिप्त नाव (५) |
|---|---|---|---|---|
| १ | १८६४ | ३ | मुंबईचा बाष्प जलयानाबाबत अधिनियम, १८६४. | महाराष्ट्र बाष्प जलयानाबाबत अधिनियम. |
| २ | १८६८ | २ | मुंबईचा तरीबाबत आणि अंतर्देशिय जलयाने याबाबत अधिनियम, १८६८. | महाराष्ट्र तरीबाबत आणि अंतर्देशिय जलयाने याबाबत अधिनियम. |
| ३ | १८६९ | १४ | मुंबई दिवाणी न्यायालय अधिनियम, १८६९. | महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम. |
| ४ | १८७४ | ३ | मुंबई वंशपरंपरागत पद अधिनियम, १८७४. | महाराष्ट्र वंशपरंपरागत पद अधिनियम. |
| ५ | १८७६ | १० | मुंबई महसूल क्षेत्राधिकार अधिनियम, १८७६. | महाराष्ट्र महसूल क्षेत्राधिकार अधिनियम. |
| ६ | १८७६ | १५ | मुंबई नगरपालिका ऋणपत्र अधिनियम, १८७६. | महाराष्ट्र नगरपालिका ऋणपत्र अधिनियम. |
| ७ | १८८२ | ७ | मुंबई लँडिंग व व्हार्फेज फी अधिनियम, १८८२. | महाराष्ट्र लँडिंग व व्हार्फेज फी अधिनियम. |
| ८ | १८८३ | ५ | मुंबई सार्वजनिक प्राधिकारी शिक्के अधिनियम, १८८३. | महाराष्ट्र सार्वजनिक प्राधिकारी शिक्के अधिनियम. |

अनुसूची-१(पुढे चालू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ९ | १८८७ | ४ | मुंबई जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७. | महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम. | |
| १० | १८८९ | १ | मुंबई ग्राम स्वच्छता अधिनियम, १८८९. | महाराष्ट्र ग्राम स्वच्छता अधिनियम. | |
| ११ | १९०४ | १ | मुंबईचा सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४. | महाराष्ट्र सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम. | |
| १२ | १९१२ | ३ | मुंबईचा शर्यतींच्या जागांबद्दल लायसन्स देण्याबाबत अधिनियम, १९१२. | महाराष्ट्र शर्यतींच्या जागांबद्दल अनुज्ञप्ती देण्याबाबत अधिनियम. | |
| १३ | १९१८ | ६ | मुंबईचा परकीय इसमांच्या अपात्रतेबाबत अधिनियम, १९१८. | महाराष्ट्र परकीय इसमांच्या अपात्रतेबाबत अधिनियम. | |
| १४ | १९२० | ७ | मुंबईचा सार्वजनिक वाहनांबाबत अधिनियम, १९२०. | महाराष्ट्र सार्वजनिक वाहनांबाबत अधिनियम. | |
| १५ | १९२३ | १ | मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३. | महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम. | |
| १६ | १९२५ | ६ | मुंबई पण कर अधिनियम, १९२५. | महाराष्ट्र पण कर अधिनियम. | |
| १७ | १९२९ | १८ | मुंबई बोर्स्टल शाळा अधिनियम, १९२९. | महाराष्ट्र बोर्स्टल शाळा अधिनियम. | |
| १८ | १९३३ | २२ | मुंबई पशुधन सुधारणा अधिनियम, १९३३. | महाराष्ट्र पशुधन सुधारणा अधिनियम. | |
| १९ | १९३६ | २० | मुंबईचा अफू ओढण्याबाबत अधिनियम, १९३६. | महाराष्ट्र अफू ओढण्याबाबत अधिनियम. | |
| २० | १९३८ | २२ | मुंबई समपहृत केलेल्या जमिनी परत करणे अधिनियम, १९३८. | महाराष्ट्र समपहृत केलेल्या जमिनी परत करणे अधिनियम. | |
| २१ | १९३९ | १० | मुंबई उद्‌वाहक अधिनियम, १९३९. | महाराष्ट्र उद्‌वाहक अधिनियम. | |
| २२ | १९४२ | २८ | मुंबई जमीन सुधारणा परियोजना अधिनियम, १९४२. | महाराष्ट्र जमीन सुधारणा परियोजना अधिनियम. | |
| २३ | १९४६ | २० | मुंबई वीज (विशेष अधिकार) अधिनियम, १९४६. | महाराष्ट्र वीज (विशेष अधिकार) अधिनियम. | |
| २४ | १९४७ | ३ | मुंबई होमगार्ड अधिनियम, १९४७. | महाराष्ट्र होमगार्ड अधिनियम. | |
| २५ | १९४७ | ११ | मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६. | महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम. | |
| २६ | १९४७ | २८ | मुंबई कर्जदार शेतकरी सहाय्य अधिनियम, १९४७. | महाराष्ट्र कर्जदार शेतकरी सहाय्य अधिनियम. | |
| २७ | १९४७ | ४३ | मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग यांबाबत अधिनियम, १९४७. | महाराष्ट्र शेतांतील पिकांवरील कीड व रोग यांबाबत अधिनियम. | |
| २८ | १९४७ | ६१ | मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७. | महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण अधिनियम. | |
| २९ | १९४७ | ६२ | मुंबईचा धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७. | महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम. | |

अनुसूची—(पुढे चालू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| ३० | १९४७ | ६४ | मुंबई वायदे करार नियंत्रण अधिनियम, १९४७. | महाराष्ट्र वायदे करार नियंत्रण अधिनियम. |
| ३१ | १९४८ | २२ | मुंबई निर्वासित अधिनियम, १९४८. | महाराष्ट्र निर्वासित अधिनियम. |
| ३२ | १९४८ | ३३ | मुंबई जमीन अधिग्रहण अधिनियम, १९४८. | महाराष्ट्र जमीन अधिग्रहण अधिनियम. |
| ३३ | १९४८ | ६७ | मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८. | महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम. |
| ३४ | १९४८ | ७९ | मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८. | महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम. |
| ३५ | १९४९ | ११ | मुंबई शरीररचनाशास्त्र अधिनियम, १९४९. | महाराष्ट्र शरीररचनाशास्त्र अधिनियम. |
| ३६ | १९४९ | १५ | मुंबई शुश्रूषा गृह नोंदणी अधिनियम, १९४९. | महाराष्ट्र शुश्रूषा गृह नोंदणी अधिनियम. |
| ३७ | १९४९ | २५ | मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९. | महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम. |
| ३८ | १९४९ | ३२ | मुंबईचा भागदारी व नरवादारी सत्ताप्रकार नाहीसे करण्याबाबत अधिनियम, १९४९. | महाराष्ट्र भागदारी व नरवादारी सत्ताप्रकार नाहीसे करण्याबाबत अधिनियम. |
| ३९ | १९४९ | ३५ | मुंबई भूमि संपादन अधिकाऱ्यांच्या कार्यवाही विधिग्राह्य करण्याबाबत अधिनियम, १९४९. | महाराष्ट्र भूमि संपादन अधिकाऱ्यांच्या कार्यवाही विधिग्राह्य करण्याबाबत अधिनियम. |
| ४० | १९४९ | ६२ | मुंबई तालुकादारी सत्ताप्रकार नाहीसा करण्याबाबत अधिनियम, १९४९. | महाराष्ट्र तालुकादारी सत्ताप्रकार नाहीसा करण्याबाबत अधिनियम. |
| ४१ | १९५० | ४ | मुंबई विलिन संस्थाने (विधी) अधिनियम, १९५०. | महाराष्ट्र विलिन संस्थाने (विधी) अधिनियम. |
| ४२ | १९५० | ६ | मुंबई खोती नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५०. | महाराष्ट्र खोती नाहीशी करण्याबाबत अधिनियम. |
| ४३ | १९५० | २९ | मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०. | महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम. |
| ४४ | १९५० | ६० | मुंबई परगणा व कुलकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५०. | महाराष्ट्र परगणा व कुलकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम. |
| ४५ | १९५१ | २२ | मुंबई पोलीस अधिनियम, १९५१. | महाराष्ट्र पोलीस अधिनियम. |
| ४६ | १९५१ | ३८ | मुंबई राज्य राखीव पोलीस दल अधिनियम, १९५१. | महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस दल अधिनियम. |

अनुसूची—(पुढे चालू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ४७ | १९५३ | ११ | मुंबई सिनेमा (विनियमन) अधिनियम, १९५३. | महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) अधिनियम. |
| ४८ | १९५३ | ४० | मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३. | महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम. |
| ४९ | १९५३ | ४२ | मुंबई जात इनामे नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५३. | महाराष्ट्र जात इनामे नाहीशी करण्याबाबत अधिनियम. |
| ५० | १९५३ | ४४ | मुंबई कौली व कट्टुबाण सत्ताप्रकार नाहीसे करण्याबाबत अधिनियम, १९५३. | महाराष्ट्र कौली व कट्टुबाण सत्ताप्रकार नाहीसे करण्याबाबत अधिनियम. |
| ५१ | १९५३ | ५० | मुंबई भू-सत्ताप्रकार नाहीसा करण्याबाबत (कागदपत्रे परत मिळविण्यासंबंधी) अधिनियम, १९५३. | महाराष्ट्र भू-सत्ताप्रकार नाहीसा करण्याबाबत (कागदपत्रे परत मिळविण्यासंबंधी) अधिनियम. |
| ५२ | १९५३ | ७० | मुंबई (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५३. | महाराष्ट्र (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम. |
| ५३ | १९५३ | ७१ | मुंबई विलीन प्रदेशांतील (जंजिरा व भोर) खोती सत्ताप्रकार नाहीसा करण्याबाबत अधिनियम, १९५३. | महाराष्ट्र विलीन प्रदेशांतील (जंजिरा व भोर) खोती सत्ताप्रकार नाहीसा करण्याबाबत अधिनियम. |
| ५४ | १९५४ | ३९ | मुंबई विलीन प्रदेश व क्षेत्रे (जहागिऱ्या नाहीशा करण्याबाबत) अधिनियम, १९५४. | महाराष्ट्र विलीन प्रदेश व क्षेत्रे (जहागिऱ्या नाहीशा करण्याबाबत) अधिनियम. |
| ५५ | १९५५ | २१ | मुंबई भिल्ल नाईक इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५५. | महाराष्ट्र भिल्ल नाईक इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम. |
| ५६ | १९५५ | २२ | मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीसा करण्याबाबत अधिनियम, १९५५. | महाराष्ट्र विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीसा करण्याबाबत अधिनियम. |
| ५७ | १९५५ | ४७ | मुंबईचा शिलोत्री हक्क (कुलाब्यापुरते) रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५५. | महाराष्ट्र शिलोत्री हक्क (कुलाब्यापुरते) रद्द करण्याबाबत अधिनियम. |
| ५८ | १९५५ | ५५ | मुंबई महामार्ग अधिनियम, १९५५. | महाराष्ट्र महामार्ग अधिनियम. |
| ५९ | १९५६ | ३ | मुंबईचा सरकारी जागा (काढून टाकण्याबाबत) अधिनियम, १९५५. | महाराष्ट्र सरकारी जागा (काढून टाकण्याबाबत) अधिनियम. |
| ६० | १९५६ | ३ | मुंबईचा हवाई रज्जूमार्गाबाबत अधिनियम, १९५५. | महाराष्ट्र हवाई रज्जूमार्गाबाबत अधिनियम. |

अनुसूची—(पुढे चालू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| ६१ | १९५६ | ३१ | मुंबईचा हिंदूंच्या सार्वजनिक पूजे-अर्चेची ठिकाणे (प्रवेश अधिकृत करणे) अधिनियम, १९५६. | महाराष्ट्र हिंदूंच्या सार्वजनिक पूजे-अर्चेची ठिकाणे (प्रवेश अधिकृत करणे) अधिनियम. |
| ६२ | १९५६ | ३८ | मुंबईचा काकवीवर नियंत्रण ठेवण्याबाबत अधिनियम, १९५६. | महाराष्ट्र काकवीवर नियंत्रण ठेवण्याबाबत अधिनियम. |
| ६३ | १९५७ | २ | मुंबईचा शेटगी वतन हक्क (रत्नागिरीचे) रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५६. | महाराष्ट्र शेटगी वतन हक्क (रत्नागिरीचे) रद्द करण्याबाबत अधिनियम. |
| ६४ | १९५७ | ५ | मुंबईचा भारित खर्च अधिनियम, १९५७. | महाराष्ट्र भारित खर्च अधिनियम. |
| ६५ | १९५८ | ८ | मुंबई विभाग कमिशनर अधिनियम, १९५७. | महाराष्ट्र विभाग कमिशनर अधिनियम. |
| ६६ | १९५८ | ४० | मुंबई वीज शुल्क अधिनियम, १९५८. | महाराष्ट्र वीज शुल्क अधिनियम. |
| ६७ | १९५८ | ६० | मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८. | महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम. |
| ६८ | १९५८ | ६५ | मुंबई मोटारवाहन कर अधिनियम, १९५८. | महाराष्ट्र मोटारवाहन कर अधिनियम. |
| ६९ | १९५८ | ६७ | मुंबई मोटार वाहने (उतारुंवर कर आकारणी) अधिनियम, १९५८. | महाराष्ट्र मोटार वाहने (उतारुंवर कर आकारणी) अधिनियम. |
| | १९५८ | ८२ | मुंबई लॉटऱ्या (नियंत्रण ठेवणे व कर आकारणी) आणि बक्षीस स्पर्धा (कर आकारणी) अधिनियम, १९५८. | महाराष्ट्र लॉटऱ्या (नियंत्रण ठेवणे व कर आकारणी) [illegible] स्पर्धा (कर आकारणी) अधिनियम. |
| ७१ | १९५८ | ९६ | मुंबई सहाय्यार्थ उपक्रम (विशेष तरतुदी) अधिनियम, १९५८. | महाराष्ट्र सहाय्यार्थ उपक्रम (विशेष तरतुदी) अधिनियम. |
| ७२ | १९५८ | ९९ | मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम, १९५८. | महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम. |
| ७३ | १९५९ | १ | मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५८. | महाराष्ट्र गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम. |
| ७४ | १९५९ | ३ | मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८. | महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम. |
| ७५ | १९५९ | २६ | मुंबई व्यापारेतर महामंडळे अधिनियम, १९५९. | महाराष्ट्र व्यापारेतर महामंडळे अधिनियम. |

अनुसूची—(पुढे चालू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ७६ | १९५९ | ३५ | मुंबई बंदिजमा, उगड व उगडिया सत्ताप्रकार नाहिसा करण्याबाबत अधिनियम, १९५९. | महाराष्ट्र बंदिजमा, उगड व उगडिया सत्ताप्रकार नाहिसा करण्याबाबत अधिनियम. |
| ७७ | १९५९ | ३६ | मुंबई न्यायालय-फी अधिनियम, १९५९. | महाराष्ट्र न्यायालय-फी अधिनियम. |
| ७८ | १९५९ | ५६ | मुंबई राज्य पोलीस कमिशनर अधिनियम, १९५९. | महाराष्ट्र राज्य पोलीस कमिशनर अधिनियम. |
| ७९ | १९५९ | ७१ | मुंबई वैधानिक निधी अधिनियम, १९५९. | महाराष्ट्र वैधानिक निधी अधिनियम. |
| ८० | १९६० | ५ | मुंबई वखार अधिनियम, १९५९. | महाराष्ट्र वखार अधिनियम. |
| ८१ | १९६० | १० | मुंबईचा भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९५९. | महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम. |
| ८२ | १९६० | ११ | मुंबईचा औषधिद्रव्ये (नियंत्रण) अधिनियम, १९५९. | महाराष्ट्र औषधिद्रव्ये (नियंत्रण) अधिनियम. |
| ८३ | १९६० | १२ | मुंबई होमिओपॅथिक वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९५९. | महाराष्ट्र होमिओपॅथिक वैद्यक व्यवसायी अधिनियम. |
| ८४ | १९६० | १९ | मुंबई खादी आणि ग्रामोद्योग अधिनियम, १९६०. | महाराष्ट्र खादी आणि ग्रामोद्योग अधिनियम. |

९

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

१ मे १९६० पासून अंमलात आलेला मुंबई पुनर्रचना अधिनियम, १९६० (१९६० चा मुंबई ११) या अन्वये नवीन गुजरात राज्याची स्थापना करण्यात आली ; आणि उर्वरित मुंबई राज्य हे महाराष्ट्र राज्य या नावाने पुढे कायम राहिले. राज्यात अंमलात असलेले मुंबई अधिनियम हे त्यातील आवश्यक त्या अनुकूलनांसह परंतु " मुंबई " या शब्दाने सुरू होणाऱ्या त्यांच्या जुन्या संक्षिप्त नावांसह, महाराष्ट्र राज्यात अंमलात असण्याचे पुढे चालू राहिले. म्हणून अधिनियमांचा भविष्यकाळात अधिक योग्य संक्षिप्त नावाने उल्लेख करणे सुकर होण्यासाठी त्यांच्या संक्षिप्त नावात " मुंबई अधिनियम " या ऐवजी " महाराष्ट्र अधिनियम " असा बदल करण्यासाठी आणि विवक्षित परिणामस्वरूप व आनुषंगिक तरतुदी करण्यासाठी उक्त मुंबई अधिनियमांमध्ये सुधारणा करणे महाराष्ट्र शासनास इष्ट वाटते.

२. म्हणून, हे विधेयक.

मुंबई,
दिनांक ११ डिसेंबर, २०११.

**पृथ्वीराज चव्हाण,**
मुख्यमंत्री.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

[ सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५४ ]

[ विवक्षित अधिनियमांची संक्षिप्त नावे ' मुंबई अधिनियम ' याऐवजी ' महाराष्ट्र अधिनियम ' अशी बदलण्यासाठी त्यांत सुधारणा करण्याकरिता विधेयक. ]

[ श्री. पृथ्वीराज चव्हाण,
मुख्यमंत्री. ]

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकिय मुद्रणालय, नागपूर.